**अर्ज क्र.** 3046/23

परिशिष्ट ब

**अर्जदाराचे नाव** : डॉ दिपक पवार

**नक्कल सेवा शुल्क रुपये:** 70/-

**पैसे भरण्याचा दिनांक** : 16.10.23

सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक या संस्थेचे ज्ञापन (विधानपत्र)

Exh-3

१.संस्थेचे नांव :-

**नक्कल अर्ज मिळाल्याचा दि.** 8.9.23

**नक्कल दिल्याचा दि.**

**नक्कल तयार करणार**

**नक्कल रुजावत करणार**

सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक

संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता :-
सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक
द्वारा : श्री.माणिक पोपटराव बोडके
फ्लॅट नं.जी-९, ठक्कर रिट्रेट बिल्डींग, जुना गंगापुर नाका, नाशिक

२. संस्थेचे कार्यक्षेत्र. - संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य राहील. संपूर्ण भारत

प्रास्ताविक पुढील नमुद व्यक्तीनी एकत्र येवुन बहुउद्देशिय व सामाजिक या क्षेत्रात काम करण्यासाठी सदर संस्था स्थापन करीत आहोत. तिचे ध्येय व उद्दीष्टये संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम २० प्रमाणे राहतील. केद्र शासन व राज्य शासनाने पारित केलेले अधिसुचना, नियम व शासन निर्णय यास अधिन राहुन योग्य ती पुर्तता करून परवानगी घेवुन खालील ध्येय-उद्देशा प्रमाणे काम केले जाईल. प्रस्तृत न्यास कायम स्वरुपाचा असेल तो कधीही रद्द होणार नाही नियमन व प्रभाव हे विश्वस्त व्यवस्था करणाऱ्यांच्या हाती नसेल व तो कधीही तसे करता येणार नाही.

सदरचा न्यास हा सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था असून त्याचे लाभार्थी कुणी एक व्यक्ती नसून समाज उपयोगी असेल.

**सत्यप्रत** 16/10/23
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**नाशिक विभाग, नाशिक**

३. संस्थेचे उद्देश :-

१) मराठी, हिंदी व इंग्रजी शैक्षणिक संस्था सुरु करुन शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे.

२) आंगणवाडी, बालवाडी, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये व उच्च महाविद्यालये स्थापन करुन शिक्षणाचा प्रचार करणे.

३) मेडीकल कॉलेज व आयुर्वेद कॉलेज, डी.एच.एम.एस., बी.एच.एम.एस., बी.ए., एम.ए. एम.बी.बी.एस., एम.बी.ए., डी फार्म सी., बी फार्म सी., एम.फार्म सी, डी.एड., बी.एड. कॉलेज, आर्किटेक्चर कॉलेज, आयटीआय, पॉलिटेक्नीक कॉलेजस, बी.ई., एम.ई कॉलेज सुरु करुन शिक्षण व प्रशिक्षण देणे.

३) दंत महाविदयालय, होमियोपॅथी महाविदयालय, चुंबकीय चिकीत्सा अभ्यासक्रम सुरु करणे. नर्सिंग कॉलेज, सीबीसी, आयआयसी, दिल्ली बोर्ड, इंग्लीश, सेमी इंग्लिश स्कुल सुरु करणे. युनानी आणि डेन्टल थेरेपी सेंटर सुरु करणे. एम.एड., हॉटेल मॅनेजमेंट., एबीए. बीबीसी. एमसीअे, बीअे. एम.अे. बी.एस्सी. बी.कॉम. बीसीअे शिक्षणाची सोय करुन देणे-

सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय ★ नाशिक विभाग नाशिक ★

४) सर्व प्रकारचे कृषीविषयक, वैदयकिय अभियांत्रिकी व्यवस्थापकीय औषध निर्मिती शास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे. बीएस्सी अॅग्री., एमएस्सी अॅग्री.,डेअरी डिप्लोमा, विधी कॉलेजची सोय उपलब्ध करुन देणे.

५) बालगृह, वसतीगृह, महिला वसतीगृह, कन्या छात्रालय, वृध्दाश्रम, आधारश्रम सुरु करुन शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे. आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या मागासवर्गीय महिलांसाठी स्वयरोजगाराचे प्रशिक्षण केंद्र सुरु करणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| --- | --- | --- |
| | | सौ मीना किशोर दराडे |

६) निराधार, निराश्रीत व अनाथ मुलामुलींसाठी अनाथाश्रम, आश्रमशाळा चालविणे. वसतीगृह, आश्रमशाळा सुरू करणे.

(७) कॉम्प्युटर विषयक ज्ञान देणेसाठी शहर व ग्रामीण भागात तसेच मागासवर्गीयासाठी आय. टी. पदवी कॉलेज सुरू करणे. कृषि विषयक पुरक प्रशिक्षण केंद्र सुरू करणे. मतीमंद, मुकबधीर व अपंग व्यक्तीच्या शिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू करणे.

(७) तांत्रिक शाळा, अभियांत्रिकी शाळा, प्रायोगिक शाळा स्थापन करून शिक्षण व प्रशिक्षण देणे.

८) आभियांत्रिकी महाविदयालय, नर्सिंग कॉलेज, इंजिनिअरींग कॉलेज, टेक्नॉलॉजी महाविद्यालय स्थापन करणे.

९) कृषी महाविदयालय स्थापन करणे. आधुनिक शेती तंत्रज्ञानासंबंधी माहिती देणे व मार्गदर्शन करणे. तसेच आधुनिक तंत्राने शेती करणे व सुधारीत तंत्रज्ञानाचा स्विकार करणेसाठी शिक्षण व प्रशिक्षण देणे. शेती तंत्रविकास व प्रशिक्षण केंद्र विविध विकास प्रकल्प नियोजन शिक्षण विकास प्रशिक्षण केंद्र उभारणे. तसेच शेती पूरक जोड व्यवसाय प्रशिक्षण देणे. फलोद्यान, रोपवाटीका व गांडूळ खते व शिक्षण केंद्र या शैक्षणिक उपक्रमातून नवी दिशा देणे.

१०) कृषी रिचर्स सेंटर सुरू करणे. गुणवंत व हुशार विदयार्थ्यांसाठी स्पर्धा परिक्षांबाबत मार्गदर्शन करणे. तसेच उच्च विदयाविभुषीत व्यक्तींचे मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करणे.

११) आयुर्वेद कॉलेज, डी.एच.एम.एस.बी., एच.एम.एस., एम.ए.एस, एम.बी.बी.एस., डी./बी.फार्म सी., एम.फार्म सी.कॉलेज सुरू करून शिक्षण व प्रशिक्षण देणे. ग्रंथालयाची सोय व सुविधा उपलब्ध करून देणे.

१२) औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरू करणे.

१३) एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी.चे प्रशिक्षण वर्ग चालविणे.

४. **सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक** या संस्थेच्या नियम व नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यांत आलेला आहे. अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची संपूर्ण पत्ते, नावे, वय, हुद्दे, राष्ट्रीयत्व आणि व्यवसाय खालील प्रमाणे आहे.

| अ.क | सभासदांचे नांव व पत्ता | हुद्दा | शिक्षण | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.सिध्दांत किशोर दराडे फ्लॅट नं.जी-९, ठक्कर रिट्रेट बिल्डींग, जुना गंगापुर नाका, नाशिक. | अध्यक्ष | फार्मा | २० | भारतीय | व्यापार |
| ०२ | सौ.पल्लवी किशोर दराडे फ्लॅट नं.६, साईराज रेसिडेन्सी, पुणे | उपाध्यक्ष | बी.फार्मा | २७ | भारतीय | घरकाम |
| ०३ | सौ.मिना किशोर दराडे फ्लॅट नं.जी-९, ठक्कर रिट्रेट बिल्डींग, जुना गंगापुर नाका, नाशिक | सचिव | बारावी | ४६ | भारतीय | घरकाम |
| ०४ | श्री.शुभम रघुनाथ केदार इंदोरेगांव, ता.जि.नाशिक | खजिनदार | बारावी | २२ | भारतीय | शेती |
| ०५ | श्री.मधुकर पोपट बोडके मु.पो.ढकांबे, ता.जि.नाशिक | कार्यकारी सदस्य | बारावी | ५६ | भारतीय | शेती |

अध्यक्ष　　　　उपाध्यक्ष　　　　सचिव

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | श्री.अमोल शरद लग्गड<br>जुनी माळी गल्ली, ता. येवला, जि.नाशिक | कार्यकारी सदस्य | एस.वाय. बी.ए. | ३७ | भारतीय | शेती |
| ०७ | श्री.सुजय मधुकर बोडके<br>मु.पो.ढकांबे, ता.जि.नाशिक | कार्यकारी सदस्य | एफ.वाय. बी.ए. | २६ | भारतीय | नोकरी |

५. आम्ही खाली सहया करणारे संस्थापक सदस्य **सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक** सदस्य जाहिर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उदेशाने आम्ही एकत्र येऊन **सौ. मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक** ही संस्था आज दिनांक १५/०८/२०२१ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सहया केल्या आहेत.

| अ क | सभासदांचे नांव व पत्ता | सही |
|---|---|---|
| ०१ | श्री.सिध्दांत किशोर दराडे<br>फ्लॅट नं.जी-९, ठक्कर रिट्रेट बिल्डींग, जुना गंगापुर नाका, नाशिक | [signature] |
| ०२ | सौ.पल्लवी किशोर दराडे<br>फ्लॅट नं.६, साईराज रेसिडेन्सी, पुणे | [signature] |
| ०३ | सौ.मिना किशोर दराडे<br>फ्लॅट नं.जी-९, ठक्कर रिट्रेट बिल्डींग, जुना गंगापुर नाका, नाशिक | सौ मीना किशोर दराडे |
| ०४ | श्री.शुभम रघुनाथ केदार<br>इंदोरेगांव, ता.जि.नाशिक | Shubham |
| ०५ | श्री.मधुकर पोपट बोडके<br>मु.पो.ढकांबे, ता.जि.नाशिक | MBoadke |
| ०६ | श्री.अमोल शरद लग्गड<br>जुनी माळी गल्ली, ता. येवला, जि.नाशिक | ASlaggad |
| ०७ | श्री.सुजय मधुकर बोडके<br>मु.पो.ढकांबे, ता.जि.नाशिक | SBoadke |

स्थळ : नाशिक
दिनांक : २९/..९../२०२१.

वरील सहया करणा-या इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सहया केल्या आहेत.

सही व तारीख : २९/..९../२०२१.

( विशेष कार्यकारी दंडधिकारी/वकिल/सनदी/लेखापाल / नोटरी) संपूर्ण नाव, पत्ता व शिक्का.

**अतुल वसंतराव गर्गे**
**ॲडव्होकेट**
२, स्वप्नवैभव अपार्टमेंट, अद्वैत कॉलनी,
शरणपुर रोड, कॅनडा कॉर्नर, नाशिक-५.
मरा/159/1997
मो. 9890267291

सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय ★ नाशिक विभाग नाशिक ★

**सत्यप्रत**
**अधिक्षक** 16/10/21
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक

अर्ज क्र. ...3846/23

अर्जदाराचे नाव : ॲड दिपक पवार

नक्कल सेवा शुल्क रुपये: 70/-

पैसे भरण्याचा दिनांक : 16.10.23

नक्कल अर्ज मिळाल्याचा दि 8.9.23

नक्कल दिल्याचा दि. 16.10.23

नक्कल तयार करणार -

नक्कल रुजावत करणार -

Exh-4-

परिशिष्ट क

सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक

नियम व नियमावली

नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या

१. संस्था :-

संस्था म्हणजे सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक असे समजले जाईल.

अध्यक्ष : अध्यक्ष म्हणजे **सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक** या संस्थेचे अध्यक्ष असे समजले जाईल.

उपाध्यक्ष : उपाध्यक्ष म्हणजे **सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक** या संस्थेचे उपाध्यक्ष असे समजले जाईल.

सचिव : सचिव म्हणजे **सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक** या संस्थेचे सचिव असे समजले जाईल.

खजिनदार : खजिनदार म्हणजे **सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक** या संस्थेचे खजिनदार असे समजले जाईल.

कार्यकारी सदस्य : कार्यकारी सदस्य म्हणजे सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक या संस्थेचे सदस्य असे समजले जाईल

२.कार्यक्षेत्र : संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य राहील. व संपूर्ण भारत

३.हिशोबाचे वर्ष संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील

सत्यप्रत 16/10/23
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग, नाशिक

**४.सभासदत्व व त्याची नोंदणीची पध्दत**

संस्थेचे ध्येय धोरण व उद्देश मान्य असलेल्या १८ वर्षावरील कोणत्याही भारतीय व्यक्तीला संस्थेचे सभासदत्व प्राप्त करता येईल. संस्थेचा सभासद होवू इच्छिणा-या व्यक्तीने प्रवेश अर्ज भरुन, संस्थेचा अर्ज दोन सभासदांच्या शिफारशीसह करावा लागेल व त्यास कार्यकारी मंडळाची मंजूरी मिळाल्यानंतर, सभासदत्वाची फी भरावी लागेल व त्यानंतरच सभासदत्वाचे अधिकार अर्जदार व्यक्तीस प्राप्त होतील.

**५.सभासदत्व रद्द होणे**

सभासद निधन पावल्यास, त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल. सभासदाचा राजीनामा कार्यकारी मंडळाने मंजूर केल्यास, त्या सभासदाचे सभासदत्व रद्द केले जाईल. सभासदास फौजदारी वा नैतिक अध:पतनाच्या गुन्ह्याबद्दल शिक्षा झाली असेल अगर सभासदाने संस्थेचे नियम व हित यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष विघातक कृत्य केले असेल तर, त्या सभासदाचे सभासदत्व, कार्यकारी मंडळाच्या शिफारशीवरुन रद्द केले जाईल. पण त्यापूर्वी अशा सभासदास आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाईल. वर्ष सुरू झालेनंतर, संस्थेची वार्षिक वर्गणी तीन महिन्यांत न दिल्यास त्या सभासदाचे सभासदत्व रद्द केले जाईल.

सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय * नाशिक विभाग नाशिक *

**६. सर्वसाधारण सभा व तिची कार्ये**

संस्थेची वार्षिक सर्व साधारण सभा, संस्थेचे वर्ष संपल्यापासून सहा महिन्यांचे आंत घेतली पाहिजे. ही सभा सर्वश्रेष्ठ व शेवटचा निर्णय देणारी सभा म्हणून समजली जाईल. या सभेत सर्व प्रकारचे सभासद भाग घेऊ शकतील.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सौ मीना किशोर दराडे<br>सचिव |
|---|---|---|

या सभेमध्ये, मागील सभेचा वृत्तांत कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमाखर्च, ताळेबंद, अंदाजपत्रक मंजूर करणे, कार्यकारी मंडळाची निवड करणे, पदाधिका-यांची निवड करणे, पुढील वर्षासाठी हिशोब तपासनीस (चार्टर्ड अकौंटंट) नेमणे, नियम व नियमावलीतील दुरुस्ती असेल तर त्यास मान्यता देणे, संस्थेचे ध्येय धोरण व कार्ये यांची चर्चा करणे व अध्यक्षांच्या परवानगीने येणारी व इतर सभासदांनी अगोदर नोटीस देवून आणलेली कामे करणे.

७.सभासदाचे प्रकार

अ. आजिव सभासद :- जी व्यक्ती संस्थेस एकदाच रूपये २१०००/- वर्गणी भरणाऱ्या व्यक्तीस अजिव सभासद असे संबोधण्यांत येईल. संस्थेच्या विधानपत्रावर सहया करणाऱ्या सदस्यांना आजिव सभासद म्हणून संबोधण्यांत येईल

ब.सामान्य सदस्य :- वार्षिक वर्गणी १०००/- वेळच्या वेळी नियमितपणे देणा-या व्यक्तीस सामान्य सदस्य असे संबोधण्यांत येईल.

**८.सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या**

कार्यकारी मंडळाने ठरवलेल्या दिवशी, वेळी व ठिकाणी सभा भरविणेत येईल. वार्षिक सभेची नोटीस सभेपूर्वी १५ दिवस अगोदर दिली पाहिजे. नियम व नियमावलीतील दुरुस्ती असेल तर त्याची नोटीस कमीत कमी १५ दिवस अगोदर दिली पाहिजे. सभेची नोटीस प्रत्येक सभासदास सही घेवून देण्यात येईल. तथापि, बाहेरगांवच्या सभासदास, सभेची नोटीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगचे पाठविण्यांत येईल. संस्थेला खरोखर उपयोगी होतील अशा व्यक्तींना निमंत्रीत व निरीक्षक म्हणून, कार्यकारी मंडळाच्या सभेत मंजूरी घेवून बोलवला येईल परंतु त्यांना संस्थेच्या मतदानात भाग घेता येणार नाही.

सभेचा कोरम, पटावरील सभासद संख्येच्या २/३ एवढा राहील. पण कोरम अभावी तहकूब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलवली जावून, त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही व तिचे सर्व कामकाज कायदेशिर राहील. परंतु सभेच्या नोटीसीमध्ये तशी सूचना आवश्यक आहे.

**९.विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये**

कार्यकारी मंडळास सर्व सभासदांच्या पुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवावयाची असेल अगर एखाद्या विशेष प्रसंगी, विशेष सर्व साधारण सभा घेता येईल. त्यावेळी, वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम पाळले जातील.

**१०.संस्थेच्या कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना**

संस्थेच्या कार्यकारी मंडळाची संख्या कमीत कमी सात जास्तीत जास्त आकरा व्यक्तीचे राहील. त्यात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व खजिनदार हे चार पदाधिकारी व उर्वरित सदस्य राहतील. पदाधिकारी हे कार्यकारी मंडळातून निवडले जातील.

**११.कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत**

**कार्यकारी मंडळाचा कार्यकाल ५ वर्षाचा राहील. कार्यकारी मंडळाची निवड दर पाच वर्षानी वार्षिक सर्वसाधारण सभेत गुप्त मतदान पध्दतीने करण्यात येईल.**

**१२.कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे**

**अध्यक्ष** :- संस्थेच्या सर्व सभांचे अध्यक्षस्थान स्विकारून, निपक्षपणाने सभा पार पाडणे. समान मत विभागणी झाल्यास निर्णायक जादा मत देणे. संस्थेच्या एकूण कामकाजावर नियमीत देखरेख व नियंत्रण ठेवणे. सचिव यांनी संस्थेचे कामकाज सुरळीत व नियमीतपणे पार पाडले नाही तर

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

स्वत:च्या अधिकारात, कार्यकारी मंडळाची व वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविणे. संस्थेच्या कागदपत्रांवर सहया करणे.

**उपाध्यक्ष** :- अध्यक्षांच्या अनुपस्थितीमध्ये, उपाध्यक्षांनी सर्व कामे पहाणे व अध्यक्षांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मदत करणे.

सचिव :- वेळच्या वेळी कार्यकारी मंडळाच्या सभा व संस्थेची वार्षिक सर्व साधारण सभा अध्यक्षांच्या पूर्व संमतीने बोलविणे व त्याचा वृतांत ठेवणे. संस्थेच्या ध्येय धोरणानुसार व कार्यकारी मंडळाच्या सुचनेनुसार, संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणे. संस्थेसाठी पत्रव्यवहार करणे व दप्तर सांभाळणे. कार्यकारी मंडळ व नोकरवर्ग यांचा दुवा म्हणून संबंध ठेवणे. त्यांच्या दैनंदिन कामावर देखरेख ठेवणे व संस्थेच्या कायदेशिर प्रतिनिधी म्हणून काम पाहणे. खजिनदार कडून मासिक जमाखर्च, पुढील खर्चाचे अंदाजपत्रक, वर्गणीचा तपशील मागविणे व कार्यकारी मंडळापुढे ठेवणे.

**खजिनदार** :- संस्थेचे दैनंदिन व वार्षिक जमाखर्चाचे कागदपत्र ठेवणे. सभासदांची वर्गणी, देणगी, व्याज कर्ज अगर येणी रक्कम जमा करून खर्चाची मान्य बिले, अध्यक्ष/कार्यकारी मंडळाच्या मान्यतेनंतर चुकती करणे. हिशोबाच्या संपूर्ण चोपडया, पावती पुस्तके, चेक्स व पासबुके इ. ची जबाबदारी खजिनदारवर राहील. मासिक व वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे. संस्थेने ठरवलेल्या बँकेत, नियमीत जमा होणारी रक्कम जमा करणे व त्या अनुषंगाने काम पाहणे.

**कार्यकारी मंडळाचे सदस्य** :- संस्थेच्या सर्व सभांना उपस्थित राहणे. संस्थेच्या कामात मदत करणे. निवडणुकीचे वेळी मतदान करणे.

**१३.कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा**
कार्यकारी मंडळाची सभा तीन महिन्यातून एक वेळा तरी बोलविली पाहिजे. अध्यक्ष यांचे गैरहजेरीत उपाध्यक्ष हे संस्थेचे काम पाहतील. कार्यकारी मंडळाचा सभासद पूर्व परवानगी शिवाय सतत तीन सभेस गैरहजर राहिल्यास, त्यांचे कार्यकारी मंडळावरील सभासदत्व रद्द केले जाईल व पुढील सभेत तसा ठराव बहुमताने मंजुर करण्यांत येईल. कार्यकारी मंडळाच्या २/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास, कार्यकारी मंडळाची सभा अध्यक्षानी मागणी केल्यापासुन १५ दिवसाचे आत बोलविली पाहिजे. अशी सभा बोलविली नाही तर सभा मागणी करणारे सभासद, अशी सभा बोलवू शकतील व त्यावेळी कार्यकारी मंडळाचे सर्व नियम पाळले जातील.

**१४. कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या**
सभासदांना सभेपूर्वी सात दिवस अगोदर नोटीस पाठविणे आवश्यक आहे. सुचनेमध्ये दिनांक, वेळ, सभेचे ठिकाण व विषय नमुद करणे आवश्यक राहील. पण तशाच प्रसंगी अध्यक्षांना, फक्त एक दिवसाची समक्ष सही घेवून नोटीस देवून, तातडीने सभा बोलविण्याचा अधिकार राहील. पोस्टाने पाठविलेली नोटीस एखादया तातडीच्या कामांसाठी निर्णय घेणे झालेस, सचिव हा अध्यक्षांच्या परवागीने कार्यकारी मंडळाकडे लेखी मत मागवून व मताधिक्क्यावरून तो ठराव अगर निर्णय संमत वा असंमत झाला असे समजण्यांत येईल. कार्यकारी मंडळाच्या सभेत २/३ चा कोरम असेल. पण कोरम अभवी तहकुब झालेली सभा, लगेच अर्ध्या तासाने बोलवली जाईल व त्यांस कोरमची आवश्यकता असणार नाही.

**१५.कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियम**
संस्थेचे अध्यक्ष हे निवडणूक अधिकारी यांची नेमणूक करतील व निवडणूक अधिकारी निवडणूकीचे काम पाहतील व निवडणूकीचा निकाल जाहिर करतील. ज्या वर्षी निवडणूक असेल त्या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसीमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यांत येईल व उमेदवारी अर्ज मागविण्यांत येतील. कार्यकारी मंडळाची निवडणूक वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांमधून गुप्त मतदान पध्दतीने होईल.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

**१६.कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत**
मयत, राजीनामा अगर अन्य कारणाने मंडळातील एखादे पद रिकामे झाल्यास, कार्यकारी मंडळातील राहिलेल्या अन्य सदस्य उर्वरित मुदतीकरतां, ते पद बहुमताने भरतील व तसा बदल अर्ज मा.सहा.धर्मादाय आयुक्त, नाशिक यांचेकडे विहीत नमुन्यात सादर करतील. सदरहू रिक्त पद सहा महिन्याचे आंत न भरल्यास, ते पद मा.सहायक धर्मादाय आयुक्त, नाशिक भरतील.

१७.संस्थेच्या कार्यकारी मंडळाची अधिकार व कर्तव्य
संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणे, नोकरवर्गाची नेमणूक करणे, सेवानिवृत्ती करणे, संस्थेच्या देण्याघेण्याचे व्यवहार पाहणे, नवीन उपसमित्या नेमणे, संस्थेच्या ध्येय धोरणानुसार इतर कामे करणे. हिशोब तपासनिसाकडून जमाखर्च व ताळेबंद तयार करून, अहवाल तयार करून घेवून, वार्षिक सभा घेणे. संस्थेचे हिशोब सन १८६० च्या संस्था नोंदणी कायदा व १९५० च्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमांतील तरतुदीनुसार ठेवून, त्याचे परीक्षण सनदी लेखापाल यांचेकडून करवून घेवून, विहीत नमुन्यांत, कार्यालयांकडे सादर करणे. पुढील कार्याची दिशा, अंदाजपत्रक तयार करून वार्षिक सभेपुढे ठेवणे. संस्थेच्या नियम व नियमावलीमध्ये दुरूस्ती, नवीन कार्य अगर इतर शिफारशी वार्षिक सर्वसाधारण सभेत करणे. वार्षिक सभेने केलेले ठराव, आदेश व धोरणाविषयक गोष्टी अंमलात आणणे.

**१८. संस्थेचा निधी मिळकत व विनियोग**
सभासद फी, देणगी, वर्गणी अनुदान संस्थेचे उत्पन्नाचे साधन राहील. संस्थेच्या उद्देश पुर्तीकरीता निधी गोळा करता येईल. निधीचा विनियोग हा संस्थेच्या उद्देशावरच केला जाईल. या पुढे देणगी, खरेदी, संपादित केलेली मिळकत ही संस्थेची मिळकत म्हणून समजण्यांत येईल. संस्थेस देणगी अुनदान इत्यादी स्वरूपाची मिळणारी रोख रक्कम, चेक ड्राफ्ट द्वारा मिळणारा निधी हा संस्थेचा समजण्यांत येईल. तसेच संस्थेस दान, देणगी, गहाण,भाडेपट्टा इत्यादी मिळणारी जंगम अथवा स्थावर मिळकत ही संस्थेची समजण्यांत येईल व याचा विनियोग संस्थेच्या उद्देशाकरिता करण्यांत येईल. सदर देणगी/दान त्या दानकर्त्यास कोणत्याही परिस्थितीत परत मागाता येणार नाही.

**१९.उदि्ष्ट निहाय खर्चाची तरतुद**
संस्थेकडे जमा असलेली रक्कम ज्या उद्देशाने रक्कम जमा केली असेल, त्या उद्देशावर ती रक्कम १०० टक्के खर्च करता येईल. कार्यकारी मंडळ वेळोवेळी जे निर्णय घेईल, त्या प्रमाणे उद्देशांवर खर्च करण्यांत येईल.
संस्थेचे स्वरूप इरिव्होकेबल म्हणजेच अपरिवर्तनीय समजले जाईल. त्यानंतर संस्था बंद करणे शक्य नाही. संस्थेच्या मालमत्तेवर संस्थेचे नियंत्रण व सत्ता राहील. हस्तातरीत हे संस्थापक राहणार नाहीत.

**२०.कर्ज या संबंधी तरतूद**
संस्थेस कायदेशिर मार्गाने, कर्ज घेता येतील. मात्र त्यासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३५ प्रमाणे, मा.धर्मादाय सह. आयुक्त, नाशिक यांची रितसर लेखी परवानगी घेणे आवश्यक राहील.

**२१.स्थावर मालमत्ता खरेदी - विक्री करणे बाबतची तरतूद**
संस्थेला योग्य वाटल्यास स्थावर मालमत्ता खरेदी करता येईल. मात्र स्थावर मालमत्तेची विक्री करावयाची असेल अगर गहाण, तबदील करावयाची झाल्यास, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३६ प्रमाणे मा.धर्मादाय सह.आयुक्त, नाशिक यांची रितसर लेखी परवानगी घेणे आवश्यक राहील.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

**२२.बँक खाते**

संस्थेजवळ असलेल्या ठेवी, शिल्लक रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा शेडयुल्ड बँकेमध्ये उघडण्यांत येईल. त्यांत संस्थेचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार या पदाधिकाऱ्यांपैकी कोणत्याही दोन सदस्यांच्याच संयुक्त सहीने पैशाची देवाण-घेवाण करणे आवश्यक राहील. संस्थेचे शक्य तितके व्यवहार हे धनादेशाद्वारे करण्याचा प्रयत्न करण्यांत येईल.

**२३.सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत**

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ नुसार व संस्था नोंदणी कायदा (महाराष्ट्र), १९७१ मधील नियम १५ प्रमाणे अनुसूची सहाचे नमुन्यात सभासदांची यादी ठेवण्यांत येईल. १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ नुसार संस्था नोंदणी कायदा (महाराष्ट्र), १९७१ मधील नियम ७ प्रमाणे, अनुसूची-२ च्या नमुन्यात, दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी मा. सहायक संस्था निबंधक यांचे कार्यालयात पाठविण्यांत येईल. तसेच संस्था नोंदणी कायदा (महाराष्ट्र), १९७१ मधील नियम ८ प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरीस लावलेल्या व्यक्तीच्या नोकरी संबंधी अटीबाबतचे विवरणपत्रक अनुसूची दोन च्या नमुन्यात मा. सहायक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठविण्यांत येईल.

**२४.नियम आणि नियमावलीतील बदल करण्याची तरतूद**

संस्थेच्या नियम आणि नियमावलीमध्ये दुरुस्ती बदल करावयाचा असल्यास, विशेष सर्वसाधारण सभेचा अजेंडा १५ दिवस अगोदर काढण्यांत यावा. विशेष सर्वसाधारण सभेत सभासदांच्या ३/५ बहुमताने ठराव मंजुर करण्यात येईल, १८६० संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल. विशेष सर्वसाधारण सभेचा अजेंडा १५ दिवस अगोदर काढण्यांत यावा. विशेष सर्वसाधारण सभेत सभासदांच्या ३/५ बहुमताने ठराव मंजुर करण्यात येईल,
संस्थेचे स्वरूप इरिव्होकेबल म्हणजेच अपरिवर्तनीय समजले जाईल. त्यानंतर संस्था बंद करणे शक्य नाही. संस्थेच्या मालमत्तेवर संस्थेचे नियंत्रण व सत्ता राहील.हस्तातरीत हे संस्थापक राहणार नाहीत.

**२५.संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याबाबतची तरतुद**

संस्थेच्या नांवात किंवा उद्देशात, बदल करावयाचा असल्यास, अथवा दोन संस्थाचे विलीनकरण करावयाचे असल्यास, १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १२ व १२अ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल. त्यासाठी विशेष सर्वसाधारण सभेचा अजेंडा १५ दिवस अगोदर काढण्यांत यावा. विशेष सर्वसाधारण सभेत सभासदांच्या ३/५ बहुमताने ठराव मंजुर करण्यात येईल,

**२६.विसर्जन**

संस्था बंद करावयाची असल्यास ३/५ सभासदांच्या बहुमताने, सर्वसाधारण सभेत मंजूरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्व प्रकारचे देणे येणे बाबतचे व्यवहार पुर्ण करावे लागतील. तसेच संस्थेची शिल्लक मालमत्ता अन्य दुस-या संस्थेला दान करता येईल. १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १३ व १४ प्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

संस्थेचे विसर्जन करावयाचे असल्यास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेवुन तसेच संस्थेची स्थावर व जंगम मिळकत समान उद्देश असलेल्या संस्थेस वर्ग करण्यांत येईल.

सौ मीना किशोर

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

दाखला :- प्रमाणीत करण्यांत येते की **सौ.मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक** या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्य प्रत आहे.

| अ.क | सभासदाचे नांव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.सिध्दांत किशोर दराडे<br>फ्लॅट नं.जी-९, ठक्कर रिट्रेट बिल्डींग,<br>जुना गंगापुर नाका, नाशिक | अध्यक्ष | |
| ०२ | सौ.पल्लवी किशोर दराडे<br>फ्लॅट नं.६, साईराज रेसिडेन्सी, पुणे | उपाध्यक्ष | |
| ०३ | सौ.मिना किशोर दराडे<br>फ्लॅट नं.जी-९, ठक्कर रिट्रेट बिल्डींग,<br>जुना गंगापुर नाका, नाशिक | सचिव | सौ मीना किशोर दराडे |

स्थळ :- नाशिक
दिनांक :- ३९./९./२०२१.

सत्यप्रत
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक

फेरफार अ क्र. 984/23

दा. ता. 14/07/23

**अर्ज क्र.** 3046/233-5-23 : परिशिष्ठ ३ :— Exh.1

(कलम — २२)

अर्जदाराचे नांव : ॲड. दिपक पवार

नक्कल सेवा शुल्क रुपये: 70/-

नक्कल तयार झाल्याचा दिनांक : 16.10.23

## बदल अर्ज

सार्वजनिक ट्रस्टच्या पंजीत अभिलीखीत झालेल्या तपशिलात घडून आलेल्या किंवा इच्छा असलेल्या बदलासंबधीचा अहवाल

सार्वननिक ट्रस्टचे नांव :— सौ. मिना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नाशिक व्दारा :— श्री माणिक पोपटराव बोडके, फ्लॅट नं. जी—९, ठक्कर रिट्रेट बिल्डींग, जुना गंगापुर नाका, नाशिक

**नक्कल अर्ज मिळाल्याचा दि.** 8.9.23

**नक्कल दिल्याचा दि.**

**नक्कल तयार करणार:** 16.10.23

**नक्कल तपासणी करणार:**

सार्वजनिक ट्रस्टचा नंबर :— एफ २१६४७ नाशिक, दिनांक ०८/०६/२०२२

सत्यप्रत 16/10/23

अधिक्षक


सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक

| बदलाचे स्वरूप | बदलाचे कारण | शेरा |
|---|---|---|
| अ) खालीलप्रमाणे नाव रेकॉडवरून कमी करण्यात यावे.<br><br>कार्यकाळ :—<br>दि. ०८/०६/२०२२ ते दि. ०८/०९/२०२२ पावेतो.<br><br>१) सौ. मिना किशोर दराडे,<br>सचिव,<br>रा. फ्लॅट नं. जी—९, ठक्कर रिट्रेट बिल्डींग, जुना गंगापुर नाका, नाशिक<br><br>२) श्री अमोल शरद लग्गड,<br>कार्यकारी सदस्य,<br>रा. जुनी माळी गल्ली,येवला, ता. येवला जि. नाशिक | संस्था — न्यास सचिव सौ. मिना किशोर दराडे तसेच कार्यकारी सदस्य श्री अमोल शरद लग्गड, यांनी राजीनामा दिल्याने त्यांचे नाव रेकॉडवरून कमी करण्यात यावे.<br><br>संस्था — न्यास सचिव सौ. मिना किशोर दराडे तसेच कार्यकारी सदस्य श्री अमोल शरद लग्गड, यांचा राजीनामा तसेच नाहरकत पत्र तसेच नवीन निवड केलेले सचिव श्री शुभम किशोर दराडे तसेच कार्यकारी सदस्य सौ. मिना किशोर दराडे यांची नावे रेकॉर्डवर घेणेकामी संमतीपत्र दिलेले आहे. त्या कारणास्तव त्यांना स्वतंत्र नोटीस काढण्याची आवश्यकता नाही.<br><br>सबब फेरफार अर्ज मंजूर करण्यात यावा. | १)दि. २७/०९/२०२२ च्या विशेष सर्वसाधारण सभा नोटीस अजेंडा व पोहोच ची नक्कल जोडत आहे.<br><br>२) दि. २७/०९/२०२२ च्या विशेष सर्वसाधारण सभा ठराव क्र.०३ ची नक्कल जोडत आहे.<br><br>३) सौ. मिना किशोर दराडे व श्री अमोल शरद लग्गड यांचा राजीनामा प्रत |

सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग नाशिक

Issue notice to outgoing trustees

Recd 31/5/23




ले ७

प्रोसेस फी म्हणून रु. 25/—

भरुन घ्यावेत.

Shaikh 3/5/2023

प्र. अधि (न्याय) 3/5/2023

Rs. 25/-

पा. क्र. 2417651

दिनांक - 03/05/2023

गरुड भिलाले

लेखापाल

| बदलाचे स्वरूप | खालीलप्रमाणे पदात बदल नोंदविण्यात यावा | शेरा |
|---|---|---|
| ब) खालीलप्रमाणे नवीन नावे रेकॉर्डवर समाविष्ट करण्यात यावे.<br><br>कार्यकाळ<br>दि. [illegible]७/०९/२०२२ ते दि. ०७/०६/२०२७<br><br>१) श्री शुभम किशोर दराडे,<br>सचिव,<br>रा. फ्लॅट नं. जी–९, ठक्कर रिट्रेट बिल्डींग, जुना गंगापुर नाका, नाशिक<br><br>२) सौ. मिना किशोर दराडे,<br>कार्यकारी सदस्या<br>रा. फ्लॅट नं. जी–९, ठक्कर रिट्रेट बिल्डींग, जुना गंगापुर नाका, नाशिक | संस्था–न्यास सचिव सौ. **मिना किशोर दराडे** तसेच कार्यकारी सदस्य श्री अमोल शरद लगड, यांनी राजीनामा दिल्याने त्यांचे जागी नवीन सचिव श्री **शुभम किशोर दराडे**, तसेच कार्यकारी सदस सौ. **मिना किशोर दराडे** , यांची निवड सर्वानुमते बहुमताने गुप्त मतदान घेऊन करण्यात आली असुन बदल अर्ज मंजुर करण्यात यावा व पदाधिकारी, विश्वस्त बदल नोंद कार्यालयीन रेकॉर्डवर नोंदविण्यात / घेण्यात यावी हि विनंती. | १)सर्व पदाधिकारी विश्वस्त यांचे नवीन अध्यक्ष व कार्यकारीणी सदस्य--विश्वस्त यांचे नाव रेकॉर्डवर नोंद करण्याबाबतचे **संमती पत्र** देत आहे. |

तारीख :– १४/०२/२०२३
ठिकाण :– नाशिक

ओळख

ॲड. डि.एम. पवार

विश्वस्ताचे नांव व सही :–
श्री मधुकर पोपट बोडके

## प ड ता ळा

मी श्री मधुकर पोपट बोडके रा. [illegible] काबे [illegible] नाशिक नाका, नाशिक वर नामनिर्दिष्ट वय ५७ वर्षे, व्यवसाय व्यापार प्रतिज्ञापुर्वक इकरार करते की, वरील अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या उत्तम माहितीप्रमाणे खरी व बरोबर आहे. नाशिक येथे प्रतिज्ञापुर्वक इकरार केला

दिनांक :– १४/०२/२०२३

माझे समक्ष

14.2.23

निरीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग, नाशिक

श्री मधुकर पोपट बोडके

**BEFORE THE ASSISTANT CHARITY COMMISSIONER,**
**NASHIK REGION, NASHIK**
**(Presided over by S.S. Latwade)**

Exh.No.16

Chang Report No.984/2023

Under Section 22 of the Maharashtra
Public Trusts Act, 1950.

In the matter of
"Sau Meena Kishor Darade Education Society, Nashik, C/o Shri.Manik Popatrao Bodake, Flat No.G-9, Thakkar Retreat Building, Old Gangapur Naka, Nashik."

P.T.R.No. F-21647/Nashik.

Shri.Madhukar Popat Bodake
Age : Major, Occ.: Agri.
R/o : Dhakambe Tal. & Dist.Nashik. ...... Applicant

V/S

Nil.

**Appearance :** Shri.D.S.Pawar, advocate for applicant.

## JUDGMENT
**(Delivered on 22.09.2023)**

This is a change report filed by the applicant, a reporting trustee in respect of change occurred in the trust due to resignation of Sau Meena Kishor Darade and Shri.Amol Sharad Lagad and appointment of Shri.Shubham Kishor Darade as Secretary and Sau Meena Kishor Darade as Executive Member for the period of 27.09.2022 to 07.06.2027 as per meeting dated 27.09.2022.

2. Reporting trustee filed on record the consent letter at Exh.3, no objection letter at Exh.4, agenda dated 09.09.2022 at Exh.5, receipt of agenda at Exh.6, minutes of meeting dated 27.09.2022 at Exh.7, list of members at Exh.8, trust registration application and order at Exh.9, memorandum of association at Exh.10, rules and regulations at Exh.11, acknowledgement at Exh.13, affidavit of examination in chief of the applicant at Exh.14 and evidence close pursis at Exh.15.

3. On perusal of the change report and the documents filed on record following points arise for my determination and I record my findings thereon with reasons as under.

| Sr. No. | Points | Findings |
|---|---|---|
| 1. | Whether the change occurred in the trust? | Yes. |
| 2. | Whether the reported change is legal and valid? | Yes. |
| 3. | What order? | Application is allowed. |

**REASONS FOR FINDINGS**

4. On perusal of the documents produced on record and after hearing the reporting trustee it appears that change is occurred in the trust due to resignation of Sau Meena Kishor Darade and Shri.Amol Sharad Lagad and appointment of Shri.Shubham Kishor Darade as Secretary and Sau Meena Kishor Darade as Executive Member for the period of 27.09.2022 to 07.06.2027 as per meeting dated 27.09.2022. The Outgoing trustee is served with due service of notice. Despite of service of notice outdoing trustee is not remained present. Therefore, it appears that he has no objection to allow the reported change.

5. It appears that reported change is as per law and as per the provisions of Maharashtra Public Trusts Act, 1950 and the rules there under. No one came forward to object the change report. The change report appears to be legal and valid. Hence, in answer to point No.1 and 2, I record my findings in the affirmative and in ansyer to point No.3 pass the following order.

**ORDER**

1. The Change Report No.984 of 2023 is hereby accepted without costs.
2. The names of Sau Meena Kishor Darade and Shri.Amol Sharad Lagad be deleted and the names of Shri.Shubham Kishor Darade as Secretary and Sau Meena Kishor Darade as Executive Member for the period of 27.09.2022 to 07.06.2027 be added to P.T.R. of trust
3. Schedule – I be amended accordingly.

22/9/23.

Date : 22.09.2023
Place : Nashik

(S.S.Latwade)
Assistant Charity Commissioner,
Nashik Region, Nashik.

सत्यप्रत

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,